## तुती लागवड व संवर्धन कोष उत्पादनाचा एकूण तपशिल

| अ.क्र. | मजुरी रक्कम | सामुग्री रक्कम | लाभार्थी हिस्सा रक्कम | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | १,८६,१८६/- | ३२,०००/- | -- | २,१८,१८६/- |

## मनरेगा अंतर्गत किटक संगोपन गृह बांधकामासाठी अनुदान

| अ.क्र. | मॉडेल | मजुरी/अकुशल रुपये | सामुग्री/कुशल रुपये | लाभार्थी हिस्सा रक्कम | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | मॉडेल (२० X ५०) (१००० चौ.फुट) | ५८,१४९.००/- | १,१८,०००.००/- | - - | १,७६,१४९.००/- |
| २. | मनरेगा माहीती फलक | | ३,०००.००/- | | ३,०००.००/- |
| | | | | | १,७९,१४९.००/- |

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण अधिनियमांतर्गत मजुरीचा संपूर्ण खर्च संबंधीत मजुराला पोस्ट / बँक खात्यामार्फत तहसिलदारांकडून देण्यात येईल. तसेच सामुग्रीचे प्रदान संबंधीत लाभधारकांनी लागवड केल्यानंतर एन.इ.एफ .टी. व्दारे तहसिलदारामार्फत करण्यात येईल.

**आवश्यक बाबी**

१. अकुशल कामे फक्त नोंदणीकृत मजुरांकडून करुन घेण्यात यावीत. तसेच संबंधीत लाभधारक हा नोंदणीकृत जॉबकार्डधारक असावा आणि त्याने बागेत मजुर म्हणून काम करणे आवश्यक आहे.
२. कामाच्या प्रत्यक्ष ठिकाणी हजेरीपत्रक ठेवण्यात येईल. त्यांच्या प्रती ग्रामपंचायत कार्यालयात ठेवण्यात येईल.
३. मजुराची मजुरी फक्त बँक /पोस्ट ऑफिस खात्यातून करण्यात येईल.
४. कंत्राटदारांना सदर कामात सहभाग घेता येणार नाही. मजुर विस्थापित करणाऱ्या यंत्राचा वापर करता येणार नाही. उदा. ट्रॅक्टरव्दारे नांगरणी करु नये.

**आवश्यक कागदपत्रे**

१) ५ पासपोर्ट फोटो, २) सातबारा/८ अ (होल्डींग), ३) आधार कार्ड,
४) पॅन कार्ड, ५) राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक छायाप्रत, ६) जातीचा दाखला,
७) रोजगार हमी कार्ड/जॉब कार्ड ८) चतुःसिमा नकाशा,
९) पाणी उपलब्धता प्रमाणपत्र १०) पॅन कार्ड

## २) केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र २ अंतर्गत अनुदान

रेशीम संचालनालयाच्या वतीने केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र -२ ही योजना सुध्दा राबविण्यात येत आहे. या योजनेतुन तुती लागवड, कीटक संगोपनगृह बांधकाम, कीटक संगोपन साहित्य, तुती रोपवाटिका, बाल कीटक संगोपनकेंद्र, रेशीम कोषापासुन धागा तयार करण्यासाठी मल्टिएंड रिलींग मशीन करीता सर्वसाधारण वर्गासाठी ७५ टक्के अनुदान आणी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी ९० टक्के अनुदान देण्यात येईल. अनुदान तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | सिल्क समग्र-२ योजनेचा तपशील | २ एकर करिता | | १ एकर करिता | |
|---|---|---|---|---|---|
| | | अनुसूचित जाती व जमाती ९०% | सर्वसाधारण ७५% | अनुसूचित जाती व जमाती ९०% | सर्वसाधारण ७५% |
| १ | तुती लागवड | १०८००० | ९०००० | ५४००० | ४५००० |
| २ | ठिबक सिंचन संच | ९०००० | ७५००० | ५४००० | ४५००० |
| ३ | किटक संगोपन गृह बांधकाम (१००० चौसेमी) | ४०५००० | ३३७५०० | २९२५०० | २४३७५० |
| ४ | किटक संगोपन साहित्य | ६७५०० | ५६२५० | ४५००० | ३७५०० |
| ५ | किटक संगोपन निर्जंतुकीकरण | ४५०० | ३७५० | ४५०० | ३७५० |
| ६ | किसान नर्सरी | १३५००० | ११२५०० | -- | -- |

टिप : रेशीम उद्योग फायदेशीर होण्याकरिता किमान १००० चौ. फुटाचे किटक संगोपन गृह असणे आवश्यक आहे.



किटक संगोपन गृह

## नोंदणी करीता आजच संपर्क साधा

**जिल्हा रेशीम कार्यालय, उमरेड रोड,**
**म.रा. हातमाग महामंडळ परिसर, नागपूर.**

### अधिकारी / कर्मचारी संपर्क दुरध्वनी क्रमांक

1. **श्री.स्वप्नील अ. तायडे** मो.: 9881620602
   जिल्हा रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१, नागपुर
2. **श्री. आदेश वाघमारे** मो.: 9766481324
   वरिष्ठ तांत्रीक सहायक, (रामटेक, पारशिवनी, सावनेर, मौदा)
3. **श्री. भास्कर जी. उईके** मो.: 8087223950
   क्षेत्र सहायक, (काटोल, नरखेड, हिंगणा, कळमेश्वर)
4. **कु. अश्विनी एन. कुडेकर** मो.: 9545685293
   क्षेत्र सहायक, (नागपूर ग्रामीण, कामठी)
5. **कु. किंजल व्हि. डांगे** मो.: 9022033707
   क्षेत्र सहायक, (कुही, उमरेड, भिवापूर)
6. **श्री.पी.पी. गाऊत्रे** मो.: 9604549966
   वरिष्ठ सहायक
7. **श्री.एफ.वाय. कुरेशी** मो.: 9421896607
   सी.डी.ई.ओ.

रेशीम शेती करुया विकासाची वाट धरुया
रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव @75

# रेशीम संचालनालय

# रेशीम उद्योग शेतीला उत्तम जोडधंदा

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम व सिल्क समग्र-२ योजने अंतर्गत तुती लागवड व किटक संगोपन गृह बांधकाम अनुदान योजना**



dsosilknag@gmail.com

## ※ प्रस्तावना ※

नैसर्गिक रेशीम धाग्याची निर्मिती रेशीम अळीच्या कोषापासुन होते. निसर्गात ४ प्रकारच्या रेशीम अळ्या आढळतात. रेशीम अळ्यांचे खाद्य हे वेगवेगळ्या वृक्षांची पाने आहेत. मोठ्या प्रमाणावर तुती रेशीम कोष उत्पादन घेण्यासाठी तुतीच्या झाडांची सलग लागवड करावी लागते. तुतीच्या झाडांची पाने खाऊ घालुन रेशीम कोष उत्पादन करणे याला 'रेशीम शेती' म्हणतात. हा एक कुटीर उद्योग असून शेतीला उत्तम जोडधंदा आहे.

### रेशीम कोष उत्पादन व्यवसाय का ?

※ शेतीला उत्कृष्ट जोडधंदा.

※ अल्प कालावधीचे पिक असल्यामुळे पाल्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास दुसऱ्यावर्षापासून वार्षिक किमान पाच पिके घेता येतात.

※ तुती लागवड केल्यानंतर १० ते१५ वर्षापर्यंत पुन्हा लागवड करण्याची गरज नाही.

※ तुतीच्या फांद्या व अळ्यांच्या विष्ठेपासुन उत्तम सेंद्रिय खत निर्मिती करता येते.

※ घरातील व्यक्तीव्दारे सहज व सुशिक्षित बेरोगार यांनी करण्यासारखा उद्योग.

※ पर्यावरण पुरक व्यवसाय.

※ महिलांचा ५०% ते ६० % सहभाग.

※ इतर पिकांच्या तुलनेत पाणी कमी लागते.

※ रेशीम कोष खरेदी किमान आधारभूत किंमत व इतर राज्यात विकण्यास सुध्दा मुभा आहे.

※ फांदी पध्दतीमुळे कमी वेळेत व योग्य व्यवस्थापन करता येते.

※ तुतीचा शिल्लक पाला जनावराचे उत्तम खाद्य.

※ विद्यावेतनासह रेशीम शेती प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन व सवलतीचे दरात अंडीपूंज पुरवठा

### ※ रेशीम कोष उत्पादन करणेसाठी काय आवश्यक आहे ※

※ शेतकऱ्याकडे किमान एक एकर उत्तम पाण्याचा निचरा होणारी व बारामाही ओलीत असलेली जमीन

※ तुती लागवड, किटक संगोपन साहित्य व पक्के आदर्श किटक संगोपन गृह बांधण्याची क्षमता व मनुष्यबळ.

※ शेतकरी प्रकल्प/समुहातील असावा. पात्र शेतकऱ्याला तुती रोपाव्दारे एक एकर तुती लागवडीसाठी रु. ५००/- नोंदणी फी रोखीने जमा करावी लागेल.

※ नोंदणी फी भरल्यानंतर परत मिळणार नाही अथवा भविष्यात त्याचा विचार केला जात नाही.

### ※ रेशीम कोष उत्पादन पिकाचा संभाव्य तपशिल (एक एकर) ※

| वर्ष | संगोपन कालावधी | अंडीपुंज संख्या | कोष उत्पादन किलो |
|---|---|---|---|
| पहीले वर्ष तुती लागवड कालावधी १५ जुन ते १५ जुलै | १ डिसें ते ३० डिसें. पहिले पीक<br>१५ मार्च ते १५ एप्रिल दुसरे पीक | २५०<br>२५० | १२५<br>१२५ |
| | दोन पिके | ५०० | २५० |
| दुसरे वर्ष तुती तळ छाटणे २५ मे ते १ जुन | १५ जुलै ते १५ ऑगस्ट<br>१ ऑक्टों. ते ३० ऑक्टो<br>१ जाने. ते ३० जानेवारी<br>१५ मार्च ते १५ एप्रिल | २५०<br>२५०<br>२५०<br>२५० | १२५<br>१२५<br>१२५<br>१२५ |
| | चार पिके | १००० | ५०० |

**दुसऱ्या वर्षापासुन ५०० ते ६०० किलो कोषाचे एक ते दिड लाख रुपयाचे उत्पन्न मिळते. ३५ ते ४० हजार पर्यंत खर्च येतो म्हणजे ६० हजार ते १ लाख रुपये निव्वळ नफा एक एकर पासून मिळवता येतो.**

### १) महात्मा गांधी रा.ग्रा.रो.ह. योजना अधिनियम लाभार्थी निवडीचे निकष

सदर योजने अंतर्गत खालील प्रवर्गातून लाभधारक निवडण्यात यावा.

१. अनुसूचित जाती
२. अनुसूचित जमाती
३. भटक्या जमाती (NT)
४. विमुक्त जमाती (DT)
५. दारिद्र रेषेखालील कुटुंबे
६. महिला प्रधान कुटूंबे
७. शारीरिक अपंगत्व प्रधान असलेली कुटूंबे
८. भुसुधार योजनेचे कुटूंबे
९. इंदीरा आवास योजनेचे लाभार्थी
१०. अनुसुचित जमातीचे अन्य परंपरागत वन्य निवासी (वन अधिकार मान्यता २००६) नुसार पात्र व्यक्ती.
११. कृषि कर्जमाफी योजना सन २००८ नुसार अल्प भुधारक (एक हेक्टर पेक्षा जास्त दोन हेक्टरपर्यंत ) व सिमांत शेतकरी (एक हेक्टर पेक्षा कमी)

ब. केंद्रशासनाच्या नवीन मार्गदर्शक सुचनानुसार एका ग्रामपंचायत क्षेत्रातील उपरोक्त प्रवर्ग १ ते १० मधील लाभार्थी सर्वप्रथम लाभास पात्र राहतील. त्याच ग्रामपंचायत क्षेत्रातील उपरोक्त प्रवर्ग १ ते १० मधील संपल्यानंतर अल्पभूधारक व सिमांत शेतकऱ्यास लाभ देण्यात येईल.

क. लाभार्थी हा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत जॉबकार्ड धारक असावा. तसेच त्याला स्वतःच्या लागवडीवर अकुशल मजूर म्हणून काम करणे आवश्यक आहे.

ड. तुती लागवड व संगोपनाच्या कामाची क्षेत्रमर्यादा एक एकर (०.४०) आहे.

### मनरेगा अंतर्गत तुती लागवड संवर्धन व कोष उत्पादनासाठी लागणारा तीन वर्षाचा कामाचा तपशिल

| अ.क्र. | तपशिल | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष मनुष्य दिवस | तृतीय वर्ष मनुष्य दिवस |
|---|---|---|---|---|
| १. | जमीन तयार करणे | १६ | ०० | ०० |
| २. | शेणखत पसरविणे | ०८ | ०८ | ०८ |
| ३. | सरी वरंबे तयार करणे | ३४ | ०० | ०० |
| ४. | तुती लागवड करणे | २० | ०० | ०० |
| ५. | निंदणी खुरपाणी वर्षातून चार वेळा | ८० | १० | १० |
| ६. | जमीन कुळविणे (दोन वेळा) | १० | ०५ | ०५ |
| ७. | पाणी देणे वर्षातुन ४० वेळा | ३० | ३० | ३० |
| ८. | कंपोस्ट/खत देणे | १८ | १० | १० |
| ९. | जैविक व तुती पोषक औषधी फवारणी | १० | ०८ | ०८ |
| १०. | तुती छाटणी | ०४ | ०४ | ०४ |
| ११. | तळ छाटणी | ०२ | ०४ | ०४ |
| १२. | पाला कापणे फांद्या कापणे | १८ | २९ | २९ |
| १३. | शेड निर्जंतूकीकरण | ०२ | ०६ | ०६ |
| १४. | चॉकी किटक संगोपन | ०७ | २१ | २१ |
| १५. | प्रौढ किटक संगोपन/कोष काढणे | २१ | ६३ | ६३ |
| १६. | कम्पोस्टींग मजुरी | ०२ | ०२ | ०२ |
| | एकूण | २८२ | २०० | २०० |

### मनरेगा अंतर्गत अकुशल (मजूरी) करीता मिळणारी रक्कम

| अ.क्र. | वर्ष | मजुरी दिवस | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | प्रथम वर्ष | २८२ | २७३ | ७६,९८६/- |
| २. | व्दितीय वर्ष | २०० | २७३ | ५४,६००/- |
| ३. | तृतीय वर्ष | २०० | २७३ | ५४,६००/- |
| | एकूण | ६८२ | | १,८६,१८६/- |

### मनरेगा अंतर्गत कुशल (सामुग्री) करीता मिळणारी रक्कम

| अ.क्र. | वर्ष | सामुग्री तपशिल | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | प्रथम वर्ष | तुती रोपे, चंद्रीका-१००, हायग्रोमीटर बैटरी ऑपरेटेड स्प्रे पंप | ३०,०००/- |
| २. | व्दितीय वर्ष | निर्जंतुकीकरण पावडर | १,०००/- |
| ३. | तृतीय वर्ष | निर्जंतुकीकरण पावडर | १,०००/- |
| | | एकूण | ३२,०००/- |